**प्रेसनोट दि.३१/०७/२०१९**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**आगामी दहिहंडी, गणेश उत्सव सन २०१९ चे अनुषंगाने गणेश मंडळांना दिल्या सुचना**

दि.२९/०७/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाणे हद्दीतील दहिहंडी व गणेश उत्सव सन २०१९ साजरा करणाया मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये मंडळाचे अडीअडचणी समाजवून घेवून त्या सोडविणेकामी पोलीसांतर्फे संपुर्ण सहाकार्य करण्यात येईल याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संपतराव भोसले, मुंढवा पोलीस ठाणे यांनी आश्वासन दिले व दहिहंडी उत्सव, गणेश उत्सव साजरा करण्याकरीताचे पोलीस विभाग तसेच पुणे महानगरपालिका यांचेकडून योग्य त्या कायदेशीर परवानग्या घेवूनच सदरचे उत्सव साजरे करणार असलेबाबत संबंधित मंडळाकडून आश्वासन घेण्यात आले व तसा सर्व मंडळांनीही त्यास होकार दिला.

तसेच पोलीस ठाणे हद्दीतील दहिहंडी व गणेश मंडळाचे पदाधिकारी/कार्यकर्ते यांना रहदारीचे रस्त्यावर दहिहंडी लावण्यात येवू नये, गणेश उत्सवाचे मंडप रस्त्यावर लावू नये, तसेच नियमापेक्षा अधिक तिव्रतेचे स्पीकर, डी.जे. चा वापर करण्यात येणार नाही याबाबत सक्त शब्दात सुचना देण्यात आल्या. यापुर्वी मुंढवा पोलीस ठाणेकडून ०२ दहिहंडी मंडळे व ५ गणेश उत्सव मंडळावर गुन्हे दाखल करण्यात आल्याचा संदर्भ देवून यापुढेही सदरची कारवाई सुरू ठेवण्यात येणार असून, कोणीही नियमांचे उल्लघन केल्यास व विनापरवाना मंडप उभारलेस संबंधितावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याबाबत सुचना दिल्या.

कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत एक गाव एक दहिहंडी/ गणेश मंडळ याबाबत आवाहन करण्यात आले व त्याबाबत मंडळांनीही हा उपक्रम योग्य असल्याचे व त्याबाबत सहमत असल्याबाबत संमती दिली.

**दि.३१/०७/२०१९**

**(संपतराव डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**

